एकात्मिक बाल विकास सेवा योजना (आहार खर्च) हया केंद्र पुरस्कृत योजनेसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीत तरतूदीपैकी लेखानुदानाने उपलब्ध करुन देण्यात आलेली तरतूद वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१९/प्र.क्र.४६/का-५
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १६ एप्रिल, २०१९

वाचा :- (१) वित्त विभाग,परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र. ४४/अर्थ-३,
दिनांक १ एप्रिल,२०१९

प्रस्तावना :-

महिला व बाल विकास विभागामार्फत एकात्मिक बाल विकास सेवा योजना (आहार खर्च) केंद्र हिस्सा ५०% लेखाशीर्ष २२३६-१९२७ व राज्य हिस्सा ५०% (लेखाशिर्ष २२३६१९३६) ही केंद्रपुरस्कृत योजना आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई या कार्यालयाकडून राबविण्यात येत आहे. या योजनेकरीता केंद्र व राज्य हिस्स्याचे प्रमाण ५०: ५० असे ठरविण्यात आले आहे.

२. पूरक पोषण आहार योजनेकरीता सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता केंद्र हिस्सा ५०% (लेखाशिर्ष २२३६१९२७) रु.६०५.६०७२ कोटी व समरुप राज्य हिस्सा ५०% (लेखाशिर्ष २२३६१९३६) रु.६०५.६०७२ कोटी याप्रमाणे एकंदर रु.१२११.२१४४ कोटी इतका **APIP** मंजूर झाला आहे.

राज्याच्या सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात एकात्मिक बाल विकास सेवा योजना (आहार खर्च) यांअंतर्गत केंद्र हिस्सा ५०% (लेखाशिर्ष २२३६१९२७) रु.५४८.७६ कोटी व समरुप राज्य हिस्सा ५०% (लेखाशिर्ष २२३६१९३६) रु.५४८.७६ कोटी याप्रमाणे एकंदर रु.१०९७.५२ कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. या तरतूदीपैकी शासन परिपत्रक क्रमांक बीजीटी २०१९/प्रक्र १४/का-४, दिनांक १० एप्रिल,२०१९ च्या सोबत जोडलेल्या **"परिशिष्ट-अ"** नुसार सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल,२०१९ ते जुलै,२०१९ या कालावधीतील खर्च भागविण्याकरीता लेखानुदान मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार केंद्र हिस्सा रु.१७५.०० कोटी व समरुप राज्य हिस्सा रु.१७५.०० याप्रमाणे एकूण रु.३५०.०० कोटी इतका निधी लेखादानातून उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमीत करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

एकात्मिक बाल विकास सेवा योजना (आहार खर्च) या कार्यक्रमाखाली राज्याच्या सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात एकात्मिक बाल विकास सेवा योजना (आहार खर्च) यांअंतर्गत केंद्र हिस्सा ५०% (लेखाशिर्ष २२३६१९२७) रु.५४८.७६ कोटी व समरुप राज्य हिस्सा ५०% (लेखाशिर्ष २२३६१९३६) रु.५४८.७६ कोटी याप्रमाणे एकंदर रु.१०९७.५२ कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

या तरतूदीपैकी शासन परिपत्रक क्रमांक बीजीटी २०१९/प्रक्र १४/का-४, दिनांक १० एप्रिल,२०१९ च्या सोबत जोडलेल्या **"परिशिष्ट-अ"** नुसार सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल,२०१९ ते जुलै,२०१९ या कालावधीतील खर्च भागविण्याकरीता लेखानुदान मंजूर करण्यात आले आहे. त्यानुसार केंद्र हिस्सा (लेखाशिर्ष २२३६१९२७) रु.१७५.०० कोटी व समरुप राज्य हिस्सा (लेखाशिर्ष २२३६१९३६) रु.१७५.०० याप्रमाणे एकूण रु.३५०.०० कोटी(अक्षरी रुपये तीनशे पन्नास कोटी फक्त) इतका निधी लेखादानातून उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर निधी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना वितरीत करण्यास व खर्च करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. या शासन निर्णयान्वये पुरक पोषणांतर्गत आहार खर्च या कार्यक्रमासाठी केंद्र हिस्सा ५०% (लेखाशिर्ष २२३६-१९२७) रु.१७५.०० कोटी व समरुप राज्य हिस्सा ५०% (लेखाशिर्ष २२३६-१९३६) रु.१७५.०० कोटी असे एकूण रु. ३५०.०० कोटी (अक्षरी रुपये तीनशे पन्नास कोटी फक्त) याप्रमाणे लेखानुदानाने उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी हा गरम ताजा आहार व THR यासाठी समप्रमाणात वितरीत करण्याची दक्षता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी घ्यावी.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०१९ च्या परिपत्रकान्वये निर्गमीत केलेल्या सूचनांनुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०४१६१६४४३८७६३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VINITA VED SINGAL

Digitally signed by VINITA VED SINGAL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=df64f63ee52f1faf8b406f825c358391702d61c47fee432e9106486eb53c4867, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=a1d52427a2acd827d0c5733431ed650d5cae8020c5730ba60883661c3be91486, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VINITA VED SINGAL
Date: 2019.04.16 16:48:02 +05'30'

(विनिता वेद सिंगल)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे उप मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री/राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधानपरिषद), विधानभवन,मुंबई.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहाय्य, मंत्रालय, मुंबई-३२
६) सचिव (महिला व बालविकास विभाग), मंत्रालय, मुंबई.
७) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई.
९) सर्व जिल्हाधिकारी.
१०) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
११) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास.
१२) सर्व महिला व बाल विकास अधिकारी, (जिल्हा परिषद).

१३) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी/ग्रामीण/आदिवासी) प्रकल्प.
१४) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१६) निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
१७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१८) कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (का.१४७२)/ वित्त विभाग (व्यय-६) मंत्रालय, मुंबई.
१९) कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, त्यांनी एकात्मिक बाल विकास सेवा योजना (आहार खर्च) या प्रयोजनार्थ सन २०१९-२० च्या खर्चाकरीता लेखानुदानाने उपलब्ध करुन देण्यात आलेला केंद्र हिस्सा (लेखाशिर्ष २२३६१९२७) रु.१७५.०० कोटी व समरुप राज्य हिस्सा (लेखाशिर्ष २२३६१९३६) रु.१७५.०० याप्रमाणे एकूण रु.३५०.०० कोटी (अक्षरी रुपये तीनशे पन्नास कोटी फक्त) इतका निधी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना BDS प्रणालीवर वितरीत करावा.
२०) निवड नस्ती कार्या-५, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
